# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये**
**दाखल केलेली तक्रार**

## क्र.मुमाआ/नों.क्र.११३३ /२३ /त.क्र.४४ /२६/०१

श्री.मॅथ्यू थॉमस

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ. व का.) एल विभाग
बृ.मुं.म.पा. एल विभाग यांचे कार्यालय,
ल.यादव मंडई, १ ला मजला, स.गो.बर्वे मार्ग,
कुर्ला (प.), मुंबई-४०० ०७०.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता एल विभाग
बृ.मुं.म.पा. एल विभाग यांचे कार्यालय,
ल.यादव मंडई, १ ला मजला, स.गो.बर्वे मार्ग,
कुर्ला (प.), मुंबई-४०० ०७०.

**तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : २४.०२.२०२६**

| | | |
|---|---|---|
| तक्रारदार | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

प्रस्तुत प्रकरणी तक्रारदार यांनी दाखल केलेल्या प्रस्तुत तक्रार अर्जात अपील क्रमांक २७४/२१/०१ यात दिनांक १६.०३.२०२१ रोजी पारित केलेल्या आदेशाचे अनुपालन झाले नसल्याचा आक्षेप नोंदवित प्रस्तुत तक्रार अर्ज दाखल केलेला आहे.

आयोगाचे आदेश प्राप्त झाल्यानंतर तसेच अपिलिय अधिकाऱ्यांच्या दिनांक १८.०१.२०१९ रोजीच्या आदेशान्वये सात दिवसात माहिती अपिलार्थिना स्पीड पोस्टने नि:शुल्क देण्याचे निर्देश देण्यात आले होते. तथापि, त्याचे अनुपालन झाले नसल्याचे प्रथमदर्शनी आढळून येते.

आज सुनावणीस तक्रारदार, विद्यमान जन माहिती अधिकारी उपस्थित असून यासंदर्भात कार्यालयीन अभिलेखात उपलब्ध असलेली तसेच अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक १८.०१.२०१९ रोजीचे आदेश व आयोगाचे दिनांक १६.०३.२०२१ रोजीच्या आदेशान्वये प्रदान करावयाच्या कागदपत्रांच्या **कलम २ (च)** प्रमाणे उपलब्ध असलेला संच हा तक्रारदार यांना लवकरात लवकर देण्यात येईल असे आश्वासित केले. तथापि, तक्रारदार यांनी त्यावर आक्षेप नोंदवीत याच प्रकरणात याआधी अनेकदा माहिती देण्याचे आदेश झाल्यानंतरही त्यांना प्रत्यक्ष कुठलीच माहिती प्रदान करण्यात आलेली नाही.

ही बाब लक्षात घेता विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.संजय दूधभाते, सहायक अभियंता, इमारत व कारखाने, एल विभाग यांना असे निर्देशित करण्यात येते की, पुढील **सात दिवसाच्या आत** अपिलार्थीशी संपर्क व समन्वय साधून उपरोक्त माहिती प्रदान करण्यात यावी. तसेच याप्रकरणी आयोगाचे दिनांक १६/०३/२०२१ रोजीच्या आदेशाचे अनुपालन न करणाऱ्या तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, इमारत व कारखाने, एल विभाग श्री. वसावे हे प्रथम अपील सुनावणीस देखील हजर होते व त्यांनी दहा दिवसात माहिती विनामूल्य देणे अपेक्षित असताना त्याचे अनुपालन केलेले नसल्याचे आढळून येते. तसेच द्वितीय अपील अर्जाच्या वेळी देखील तत्कालीन जन माहिती अधिकारी अनुपस्थित होते व या आदेशाचेही अद्याप अनुपालन झाले नाही.

ही बाब लक्षात घेता तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.वसावे यांच्याविरुद्ध **कलम १९ (८) (ग) व २० (१)** अन्वये अधिकतम शास्ती कार्यवाही करण्याच्या निर्णयाप्रत आयोग येत असून श्री.वसावे यांना **कलम १९ (८) (ग) व २० (१) तरतुदीनुसार अधिकतम रुपये २५,०००/- इतकी शास्ती कारवाई अंतिम** करण्यात येत असून उपरोक्त शास्तीची रक्कम ही त्यांच्या मासिक पगारातून कपात करून योग्य त्या लेखाशीर्षाखाली जमा करण्याचे निर्देशही देण्यात येत आहेत.

**उपरोक्त आदेशाची अंमलबजावणी कार्यकारी अभियंता, एल विभाग यांच्याकडून होणे अपेक्षित असून याचा अनुपालन अहवाल देखील आयोगास सादर करावा.**

**आदेश**

**१.वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**
**२.वरील तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission Maharashtra

( राहुल भा. पांडे )
राज्य मुख्य माहिती आयुक्त

ठिकाण : मुंबई
दिनांक : २४.०२.२०२६